वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. २५ सप्टैंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बशीरगंज भागात चौरांनी फोडली पान टपरी




बीड : शहरातील बशीरगंज परिसरात प्रसिध्द असलेले जमीन पान सेंटर आणि तारा पान सेंटर या दुकानाची रात्री ३.३० च्या सुमारास एका चोरानी कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश करत थेट पैशाच्या गल्ल्याकडे धाव घेतली आणि गल्ल्यात असलेले पैसे काढून घेतले. या चोराचे सीसीटिव्हीमध्ये कैद झाले असून या चोरानी आता पर्यंत किती ठिकाणी चोरी केली याची आता पोलिसांची सखोल चौकशी करणे गरजेचे असून भर चौकात चोर चोरी करत असेल तर इतर ठिकाणची काय अवस्था असेल? याकडें पोलीस अधिक्षकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# दर्गा हजरत शहेंशाहवलीच्या जतन व दुरूस्तीसाठी अजितदादांनी मुस्लिम समाजाला दाखविले गाजर

## मुस्लिम समाजात प्रचंड संताप, अजितदादांच्या भुमिकेविषयी समाजात नाराजी

## चापलूसबाज मुस्लिम पुढारी गटारी आणि रस्त्याच्या कामांसाठी मागे पुढे फिरतात

Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

# डॉ.योगेश क्षीरसागरांनी जाणूनबुजून दर्गाहला निधी मिळू दिला नाही?

## डॉ.योगेश क्षीरसागरांचीही भुमिका संशयास्पद

## पिता-पुत्रांची पहिल्या पासून मुस्लिम विरोधीच भुमिका?



## अजितदादा तुम्ही ग्रामीण भागात पाहणी दौरा करत आहात त्याच प्रमाणे शहरी भागातही पाहणी दौरा करा

बीड, (दिव्य न्युज):- आज कंकालेश्वर मंदिराच्या विकासासाठी दादांनी भरभरून निधी दिला. त्याबद्दल त्यांचे मनापासून धन्यवाद... दादा तुम्ही मुस्लिम समाजावर अन्याय करतान हे कधीही स्वप्नात कोणीही पाहिलेले नाही. बीड शहरात मुस्लिम समाजाचे देवस्थान म्हणून प्रसिध्द असलेले शहेंशाहवली दर्गाह असून ६00 वर्षापुर्वीची ही दर्गाह आहे. सर्वच समाजाची श्रध्दा या दर्गावर असून आज अनेक ठिकाणी ही दर्गा मोडकळीस आलेली आहे.

कोणत्याही प्रकारचे जतन व दुरूस्तीचे काम या दर्गात झालेले नाही. आम्हाला अपेक्षा होती की तुम्ही कंकालेश्वर मंदिराच्या सोबतच दर्गाह हजरत शहेंशाहवलीच्या जतन व दुरूस्तीसाठी भरभरून निधी देतान परंतु तुम्ही मुस्लिम समाजावर अन्याय केला. मुस्लिम समाजाच्या देवस्थानावर

## शहरात फेरफटका मारल्यानंतर तुमचे लाडके डॉ.योगेश क्षीरसागरांना विचारा ३५ वर्षात काय विकासाचे दिवे लावले

## आजही अनेक मुस्लिम बहुलभाग विकासापासून वंचित तुंबलेल्या नालीचे पाणी घरात शिरले, रस्त्यावर पडले खड्डेच खड्डे

# मुख्याधिकारी शैलेश फडसे त्या बिल कलेक्टरावर महेरबान

## नोटीस देवून आपला खुलासा सादर करण्याचे सांगितले

### खरं तर मुख्याधिकाऱ्यांनी असल्या बोगसगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करणे गरजेचे



बीड, (दिव्य न्युज):– मागील दोन अंकात आम्ही बीड नगर पालिकेतील वसुली विभागातील पीटीआर गट क्रं. ३/१७, ३/१८ मधील बील कलेक्टरांनी केलेल्या गैर कामांचा पर्दाफाश केला होता. या महाशयाने अनेकांकडून लाखो रूपये उकळले आणि बोगस कामांचा धडाका लावला. एकाकडून चक्क त्याने लाख रूपये घेवून बोगस पीटीआरच करून दिला. नंतर संबंधित जागा मालकाला याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार केली. दिव्य वार्ताच्या बातम्यामुळे शैलेश फडसे यांनी त्या गैर कामे करणाऱ्या बील कलेक्टराला नोटीस दिली आणि आपला खुलासा सादर करा, न केल्यास तुमच्या विरूध्द पुढील कारवाई करण्यात येईल असे सांगितले. यामुळे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी त्या कर्मचाऱ्यावर आपली महेरबानीच दाखविली आहे. असल्या बोगसगिरी करणाऱ्या बील कलेक्टराला तात्काळ निलंबित करणे गरजेचे असतांना मुख्याधिकाऱ्यांनी त्याला खुलासा सादर करण्याची नोटीस दिल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. या बील कलेक्टरानी असे एक नव्हे तर अनेक प्रकरणे केले असून त्याचे सर्व पुरावे दिव्य वार्ताच्या हाती लागलेले आहेत मुख्याधिकाऱ्यांनी २२/९/२०२५ रोजी सदरील बील कलेक्टराला आपले म्हणणे सादर करण्याची नोटीस दिली. या बील कलेक्टरांनी ३/१८ आणि ३/१८ मध्ये अनेक बेकायदेशीर नामांतर केले असून अनेकांच्या पीटीआर वर बांधकामाची नोंद करून दिलेली आहे. त्यामुळे नगर पालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून याला जबाबदार कोण? कोणावर कारवाई मुख्याधिकारी करणार आहेत. पुढील अंकात या बील कलेक्टरांनी किती नामांतर केले आणि किती बांधकामांची नोंद बेकायदेशीरपणे करून दिली. याची सविस्तर बातमी प्रकाशित करण्यात येईल.

# पावसाने उध्वस्त झालेल्या संसारांना जावेदभैय्या कुरेशींचा आधार

## हजारो गरीब कुटुंबाना किराणा किट वाटप





बीड, (दिव्य न्युज):–अतिवृष्टीने बीड शहरातील मोमीन पुरा, गांधीनगर, बालेपिर व अख्तर नगरसारख्या झोपडपट्ट्यांत संसार उध्वस्त झाले. गल्लो गल्लीत पाणी घुसल्याने साहित्य भिजले, भाकरी-भात चुरगळले. गरीबांच्या डोळ्यात अश्रू तरळले, पण याच संकटकाळात एका समाजसेवकाने हात जोडून मदतचा हात पुढे केला. एकता युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी! 'मानवता हीच खरी धर्म' हे ध्येय डोळ्यांत बांधून, दररोज २०० किराणा किट वाटप करत, ते हजारो कुटुंबांना आधार देत आहेत. बुधवारपर्यंत त्यांच्या या सत्कार्याने संपूर्ण बीड जिल्ह्यात त्यांचे कौतुक होत आहे. मुसळधार पावसाने बीडला झोडपले. २३ सप्टेंबरपर्यंत सतत पडलेल्या पावसाने गल्लो गल्लीत पाणी घूसले होते. मोमीन पुरा येथील एका ५० वर्षीय महिला सांगतात, घरात पाणी घुसले, तांदूळ-डाळी भिजल्या. मुलांना भाकरी कशी द्यायची? जावेद भैय्या आले, किट दिले. फरिश्ते सारखे वाटले! अशा शेकडो कुटुंबांच्या जखमांवर मलम लावत, जावेद भैय्या कुरेशींची एकता युवा मंचची टीम सकाळपासून रात्रीपर्यंत धावपळ करतेय. प्रत्येक किटमध्ये तांदूळ, गहू, डाळी, तेल, साबण-सोडा यांसारखे दैनंदिन गरजा. सर्व जाती-धर्मांसाठी हे काम. गरीबी हीच खरी आपत्ती, ती दूर करण्यासाठी मी झटतो, असा निर्धार जावेद भैय्या सांगतात. तसेच त्यांचे सामाजिक कार्य आता लाखो लोकांपर्यंत पोहोचले आहे. जावेद भैय्यांचा हा प्रवास प्रेरणादायी आहे. २०१५ मध्ये एकता युवा मंचची स्थापना केली. रक्तदान शिबिरांपासून आरोग्य तपासणीसह अनेक उपक्रम राबवले. पण या पूरसंकटात त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन अधिक चमकला. पूर आला तो विनाश आणायला, पण आपण एकत्र आलो तर बांधू शकतो, असं ते कार्यकर्त्यांना सांगतात. बुधवारपर्यंत २,००० हून अधिक किट वाटप झाली आहे. जावेद भैय्या कुरैशी सारखे लोक असतील तर समाज मजबूत होईल, असा विशास नागरिकांनी व्यक्त केला.या संकटात जावेद भैय्या कुरेशींच्या या प्रयत्नांनी गरीबांच्या चेहऱ्यावर हास्य परतले. जावेद भैय्यांसारखे लोक समाजात असतील तर पूरही हरकत घेत नाही. बीडच्या या 'भैय्या'ने दाखवले, की एकट्याचा हातही समाजाला वाचवू शकतो.

# तानाजी सावंतांचे मंत्रिपद पक्के!

## शिंदेंच्या 'या' दोन मंत्र्यांना द्यावा लागणार राजीनामा?

मुंबई, (दिव्य न्युज):– पुढील आठवड्यात मंत्रिमंडळ विस्तार होणार असून धनंजय मुंडे आणि तानाजी सावंत यांना मंत्रिपद मिळणार आहे, असे वृत्त एका वर्तमानपत्राने दिले आहे. मंत्रिमंडाळातील सर्व मंत्रिपदाचा जागा भरलेल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नरहरी झिरवळ यांचा राजीनामा घेत धनंजय मुंडेंना संधी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे तानाजी सावंतासाठी कुठल्या मंत्र्याला नारळ मिळणार याची चर्चा सुरू झाली आहे.

एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी तानाजी सावंतांना तातडीने मुंबईला बोलावून घेतले होते. त्यांनी बंददाराआड सावंतांशी चर्चा देखील केली. मराठवाड्यातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाची पाहणी करण्यासाठी शिंदे आले असता त्यांच्यासोबत तानाजी सावंत हे देखील होते. त्यामुळे सावंत यांची लवकरच मंत्रिमंडळात एन्टी होईल, असे बोलले जात आहे.तानाजी सावंत यांना मंत्रिमंडळात संधी देण्याच्या चर्चा असताना शिवसेनेचे दोन मंत्री डेंजर झोनमध्ये आहेत. त्यापैकी एकाचा राजीनामा घेण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. मात्र, शिवसेनेकडे अधिकृतरित्य यावर अजून कोणीही भाष्य केलेले नाही.



त्या दोन मंत्र्यांमध्ये संजय सिरसाट आणि भरत गोगावले यांचा समावेश असल्याचे बोलले जात आहे.

संजय सिरसाट यांच्यावर विरोधकांकडून भ्रष्टाचाराचे आरोप केले जात आहेत. सिडकोतील जमीन वाटपाच्या एका प्रकरणावरून रोहित पवार त्यांना टार्गेट करत आहेत. त्यातच पैशाचे भरलेली बॅग त्यांच्या बेडरुममध्ये दिसत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यांच्यावर टीका करण्यात येत होती. त्यामुळे संजय शिरसाट यांचे मंत्रिपद अडचणीत असल्याची चर्चा आहे.भरत गोगावले हे रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी आग्रही आहेत. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांसोबत आरोप प्रत्यारोप देखील सुरू आहेत. मात्र, गोगावले यांच्या खात्याची कामगिरी समाधानकारक नसल्याची चर्चा आहे. एकनाथ शिंदे यांनी देखील मंत्र्यांना त्यांची कामागिरी सुधारण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यामुळे भरत गोगावले हे देखील डेंजर झोनमध्ये असल्याचे बोलले जात आहे.

# कुंडलिका नदीत वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह अखेर सापडला

वडवणी (दिव्य न्युज):– कुंडलिका नदीच्या पुरात वाहून गेलेल्या अक्षय बाबासाहेब जाधव (वय २८, रा. कुप्पा) या युवकाचा मृतदेह अखेर आज, गुरुवार २५ सप्टेंबर रोजी सकाळी ७:४० वाजता तुकडेगाव येथील बंधाऱ्यात अडकलेल्या अवस्थेत आढळला.



वडवणी तालुक्यातील कुप्पा ग्रामपंचायत अंतर्गत इंदिरानगर परिसरात राहणारा अक्षय जाधव दिवशी सायंकाळी शेतातून घरी मंगळवारी (दि.२३) परतत होता. तेव्हा दुथडी भरून वाहणाऱ्या कुंडलिका नदीच्या पाण्याचा अंदाज न आल्याने तो पुरात वाहून गेला होता.ही घटना कळताच महसूल प्रशासनाने स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम राबवली होती. पोहण्यासाठी गेलेल्या मुलांनी बंधाऱ्यात मृतदेह पाहिल्यानंतर त्यांनी प्रशासनाला याची माहिती दिली. या दुर्दैवी घटनेमुळे कुप्पा गावावर शोककळा पसरली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी कुप्पा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात येणार आहे.

पान १ वरून

## दर्गा हजरत शहेंशाहवली

तुम्ही दुर्लक्ष केलेत याबद्दल मुस्लिम समाजात प्रचंड चिड तुमच्या विषयी दिसून येत आहे. समाजाची भावना झाली की अजितदादांनी मुस्लिम पुढाऱ्यांसह मुस्लिम समाजाला विकासाचे गाजरच दाखविले. मुस्लिम समाजाचे पुढारी गटारी आणि रस्त्याच्या कामांसाठी तुमच्या मागे पुढे फिरतात. हा त्यांचा व्यक्तीगत स्वार्थ आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगून ज्या प्रमाणे कंकालेश्वर मंदिराच्या विकास कामांचा डेव्लपमेंट प्लॅन तयार केला. त्याच प्रमाणे दर्गाह हजरत शहेंशाहवलीच्या विकास कामांचा डेव्हलपमेंट प्लॅन तयार करणे गरजेचे होते परंतु या महत्वाच्या प्रश्नाकडे मुस्लिम पुढाऱ्यांचे दुर्लक्ष पाहून अजित दादांनीही चांगलेच गाजर दाखविल्याची चर्चा बीड शहरात होत असून दुसरीकडे बीड शहराच्या अनेक भागात झालेल्या पावसामुळे अनेक घरात पाणी शिरले, रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले. आज अनेक भाग खास करून मुस्लिम मोहल्ले हे विकासापासून कोसो दुर आहेत. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या कुटूंबियांनी आपल्या ३५ वर्षाच्या सत्तेच्या काळात मुस्लिम बहुल भागाकडे साफ दुर्लक्ष केले. त्यांची भुमिका ही पहिल्यापासून अशीच आहे. दादा तुम्ही ग्रामीण भागाचा दौरा करत आहात त्याच प्रमाणे बीड शहरातील अनेक भागात आपण भेटी द्या नागरीकांशी संवाद साधा आणि का विकास झाला नाही ते योगेश क्षीरसागरांना विचारा...

# मारहाण, तोंडावर लघुशंका करतानाचा व्हिडीओ बनवला

## लक्ष्मण हाकेंच्या जवळच्या व्यक्तीचा दुसरा संतोष देशमुख करण्याचा प्रयत्न

माजलगाव, (दिव्य न्युज):– ओबीसी आंदोलनाचे नेते लक्ष्मण हाके यांचे निकटवर्तीय सहकारी पवन कंवर यांच्यासह त्यांच्या तीन सहकाऱ्यांवर हल्ला झाल्याची घटना समोर आली होती. ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांचे अतिशय विश्वासू समजले जाणारे पवन कंवर व त्यांच्या तीन साथीदारांवर तालुक्यातील सावरगावजवळ जेवणासाठी थांबले असतानाच प्राणघातक हल्ला झाला होता. यात पवन कंवर हे गंभीर जखमी झाले आहेत, तर त्यांचे साथीदार किरकोळ जखमी झाले होते, या घटनेनंतर लक्ष्मण हाके यांनी संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांच्या या कार्यकर्त्याला माजलगावमधील एका हॉटेलमध्ये मारहाण करून त्याचा व्हिडीओ बनवला. त्यानंतर अंगावर लघुशंका केल्याची घटना समोर आली आहे. हॉटेलमध्ये लावलेल्या राष्ट्रवादीच्या विजयसिंह पंडितांच्या फोटोवरून हा वाद सुरू झाल्याची माहिती आहे. या प्रकरणी हॉटेलमालकासह सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, बुधवारी दुपारी लक्ष्मण हाके यांनी बीडच्या पोलिस अधीक्षकांची भेट घेत आरोपीच्या अटकेची मागणी केली.

पवन पांडुरंग कंवर (वय २९, रा. केरवाडी, जि. परभणी) हे मंगळवारी रात्री आपल्या मित्रांसोबत माजलगावकडील गढी रोडवरील एका हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी थांबले. हॉटेलमध्ये विजयसिंह पंडित यांचा फोटो पाहून त्यांनी जेवणाची ऑर्डर रद्द केली. यामुळे संतापलेल्या हॉटेलमालक प्रवीण जगताप आणि नितीन जगताप यांनी 'मराठ्यांना शिव्या देतो का?' असं म्हणून पवन यांच्यावर लोखंडी रॉड आणि काठीने हल्ला चढवला. या हल्लूयात पवनच्या डोक्याला, हातांना आणि पायांना गंभीर



दुखापत झाली. मारहाणीदरम्यान, हल्लेखोरांनी 'आमदार साहेबांना मारणारा हाच होता, गाडीवर नाचणारा हाच होता' असे म्हणत पवनला मारहाण केली.

लक्ष्मण हाके यांनी माजलगाव येथील हल्ल्यासंदर्भात काल (बुधवारी, ता २४) पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांची भेट घेऊन गंभीर आरोप केले आहेत. त्याचबरोबर आरोपींना पकडण्यासाठी दोन दिवसांचा अल्टीमेटम देखील दिला आहे, अन्यथा पोलिस ठाण्यात मोर्चा काढू असा इशारा हाकेंनी काल दिला आहे. हा हल्ला म्हणजे दुसरा संतोष देशमुख करण्याचा प्रयत्न होता, असे हाके म्हणालेत. हल्लूयातील आरोपी प्रवीण जगताप आणि नितीन जगताप हे वाळू माफिया असून, आमदार विजयसिंह पंडित यांचे कार्यकर्ते असल्याचा आरोपही हाकेंनी केला आहे.

ओबीसी कार्यकर्ता पवन कंवर याच्यावर हल्ला करणारे गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांचेच कार्यकर्ते आहेत. त्यांच्यासोबत आरोपींचे फोटो देखील आहेत. तसेच याच कार्यकर्त्याने फेसबुकवर पोस्ट केली होती, यामध्ये त्याने विजयसिंह पंडित यांना उद्देशून मला काम देऊ नका परंतु हाके याला ठोकायची परवानगी द्या, असे म्हटले होते. त्याच कार्यकर्त्याच्या हॉटेलमध्ये पवन करवर हे जेवण्यासाठी गेले असता त्या ठिकाणी २० ते २५ जणांनी मिळून हल्ला केला. यामध्ये कंवर यांचा एक हात व एक पाय फ्रॅक्चर झाला आहे. तसेच डोक्यात देखील रोडचा घाव घालण्यात आल्याची माहिती प्राध्यापक हाके यांनी दिली असून आता पोलिस अधीक्षकांची भेट घेत या आरोपींना अटकेची मागणी केली आहे. संध्याकाळपर्यंत आरोपींना अटक करण्याचे आश्वासन बीडच्या पोलीस अधीक्षकांनी दिल्याचे देखील माहिती प्राध्यापक हाके यांनी दिली.

पान ४ वरून

## ओबीसी आरक्षणाच्या

आली आहे. मृत युवकाच्या खिशात एक चिठ्ठी आढळून आली असून त्यामध्ये ओबीसी आरक्षण गेल्याने समाजाचे नुकसान झाले आहे आणि त्याच चिंतेने मन:स्थिती ढासळली असे नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिक व नातेवाईकांनी प्रशासनाकडे पीडित कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

## मांजरसुंबा येथील शहादेव

अग्निशमन दल गेवराई व बीड येथील कर्मचाऱ्यांनी सहा तासाच्या अथक प्रयत्नानंतर पाच वाजता त्यांचे पार्थिव शरीर विहिरीतून बाहेर काढले . यावेळी तलाठी पांढरे साहेब तसेच महसूलचे कर्मचारी व पोलीस उपस्थित होते . नेकनुर येथील दवाखान्यात शवविच्छेदन झाल्यानंतर रात्री नऊ वाजता मांजरसुंबा येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले . शहादेव यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा नीरज व २ विवाहित मुली असा परिवार आहे. शहादेव यांच्या आत्महत्येने सर्वत्र हळहळ व दुःख व्यक्त करण्यात येत आहे

## कर्तव्य आणि माणूसकी

सहाय्याची भावना निर्माण होऊन प्रेरणा मिळावी.अंभोरा पोलीस स्टेशन हे केवळ कायदा राखणारे ठिकाण नसून,नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे आश्रयाचे ठिकाण आहे,हेच या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे. शसंकटावर मात करण्यासाठी आपण सर्वजण एकत्र आहोत,हिच खरी ताकद आहे.अंभोरा पोलीस स्टेशन सुख दुःखात आपल्या मदतीसाठी सदैव तत्पर आहे.अशी भावना आंभोरा पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी यावेळी व्यक्त केली.

## भावी जि.प.सदस्यांना

सभापतींचे निवासस्थान असलेली जागा महसूल भावनाला देण्यात आलेली आहे. अध्यक्षांचा बंगला भूत बंगला बनला. आहे तर जिल्हा परिषदेत असलेले अध्यक्ष उपाध्यक्ष आणि सभापतींच्या दालनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. जुन्या गुत्तेदाराला काम परवडत नसल्याने सदील गुत्तेदार काम अर्धवट सोडून गेल्याचे समजते.

## हा भूत बंगला नाही,

ते सर्व विभाग आहेत जे विभाग मंत्रालयात पाहायला मिळतात. ग्रामीण भागाशी थेट जिल्हा परिषदेची नाळ जोडलेली आहे. त्यामुळे एक जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि चार सभापती असे या मिनी मंत्रालयाचे मंत्रिमंडळ असते. या संपूर्ण बाबी पाहता सर्व सभापतींना आणि जिल्हा परिषद अध्यक्षांना राहण्याची आणि स्वतंत्र दालनाची व्यवस्था करण्यात येते. मात्र मागील काही वर्षांपासून प्रशासक असल्याने सर्व काही अधिकाऱ्यांच्या हातात जिल्हा परिषदेचा कारभार आहे. आणि यामुळेच पदाधिकाऱ्यांच्या सुखसुईकडे अधिकाऱ्यांनी कानाडोळा केल्याचे पाहायला मिळते. अधिच जिल्हा परिषदेकडे स्वतःचा निधी नाही, सरकारची अवस्था काय आहे हे सर्वांनाच माहिती आहे. अशा परिस्थितीत आगामी तीन ते चार महिन्यात या सर्व बाबी जिल्हा परिषद अशा पूर्ण करतील हे पाहणे आता गरजेचे आहे.